## ग्रामपंचायत धामनगांव ता बदनापुर जि जालना

## ई निविदा सुचना क्र.२०२६-२०२७/१

ग्रामपंचायत **डोंगरगांव दा. ता बदनापुर जि जालना** यांना खालील नमुद केलेल्या कामासाठी जि.प.कडील योग्यत या नोंदणीकृत व वर्गवारीतील अनुभवी मक्तेदारांच्याकडुन बी १ नमुन्यातीलई निविदा प्रणालीव्दारे ऑनलाईन निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क. | कामाचेनाव | निविदा रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | टेंडर फी रक्कम रु. | आवश्यक कंत्राटदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Construction of Anganwadi Building,At Village, Dhongargaon(Da) Tq Badnapur Dist Jalna | ९२९६२३ | ९३००/- | ५००/- | **जिप कडिल नोंदनीकृत** | ६ महिने |

**<u>निविदेच्या अटी व शर्तीखालीलप्रमाणे</u>**

१) उपरोक्त कामा बाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमुद केलेला असून निविदा संच ऑनलाइन दि. 15/05/2026 ते दि. 22/05/2026 या कालावधीत https://mahatenders.gov.in/nic या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

२) निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क प्रसिध्दी धारकाने राखून ठेवला आहे.

३) सदर निविदेच्या संदर्भातील अटी व शर्ती,सुचना,शुध्दीपत्रके याबाबतची माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल.

४) सदरची निविदा ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच व ग्रामसेवक तसेच ग्रा.पं.सदस्य यांचे उपस्थित उघडणेत येईल. सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही वेळेत निविदा उघणेत येतील.

५) मक्तेदारांनी सादर केलेली निविदा व निविदे मधील दर हे लिफाफा क्र.२ उघडले नंतर १२० दिवस वैध राहतील.

६) ज्या मक्तेदाराची निविदा मंजूर होईल त्या मक्तेदारास विहीत किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करून दयावा लागेल. सदर करार नामा करताना निविदेच्या नोटीस मधील अटी व शर्ती ऐवजी अन्य अर्टी व शर्ती वाढविणेचा अधिकार प्रसिध्दी धारकाने राखुन ठेवला आहे.

७) ज्या मक्तेदाराची निविदा मंजूर होईल त्यास ग्रामपंचायतीचे पत्र मिळताच कामाच्या रक्कमेच्या ५ टक्के इतकी सुरक्षा अनामत आठ दिवसाच्या आत जमा करावी लागेल. त्यापैकी २.५ टक्के सुरक्षा अनामत कार्यारंभ आदेश देणे पूर्वी ग्रामपंचायमध्ये जमा करावी व जमेची पावती घ्यावी तर उर्वरित २.५ टक्के सुरक्ष अनामत पहिल्या धावत्या बीलातून कपात करणेत येईल. तसेच मक्तेदारांनी विहीत वेळेत सुरक्षा अनामत ग्रामपंचायतीत जमा केली नाही अथवा करारनामा केला नाही तर सदर मक्तेदारास कामाची गरज नाही असे समजून त्याची निविदा रदद करणेत येईल व त्याचे नाव काळया यादीत टाकणेसाठी संबधीत कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेत येईल व सदर मक्तेदारास या ग्रामपंचायतीच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

८) ज्या मक्तेदारास निविदा मंजूर होईल त्याने काम सुरू केले नंतरते विहीत मुदतीत पूर्ण करणे गरजेचे आहे. कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण करणेचा कालावधी वाढवून मिळणार नाही. काम करणेस विहीत मुदतीपेक्षा विलंब झालेस नियमा प्रमाणे दंडाची आकारणी करणेत येईल.

९) ज्या मक्तेदारास कामाचा आदेश देणेत येईल त्याचे बील आदा करताना शासकीय नियमाप्रमाणे लागू असणाऱ्या रक्कमा कपात करून घेणेत येतील. उदा.आयकर,विक्रीकर,रॉयल्टी,विमाइ.

१०) ज्या मक्तेदाराची निविदा मंजूर होईल त्याने सदरचे सुरू केले नंतर काम करणेस असमर्थता दर्शविलेस संबधीताची सुंरक्षा अनामत जप्त करणेत येईल.

११)काम पूर्ण झाल्यावर सदर कामाचा देखभाल दुरूस्तीचा कालावधी समाप्ती नंतर संबधीत कामाची सुरक्षा अनामत परत दिली जाईल. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१२)निविदे मधील सर्व वा कोणतीही अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या मक्तेदाराच्या निविदा अथवा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील. तसेच कोणत्याही अटींवर आधारीत निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा मंजूर केल्या जाणार नाहीत.

१३)सदर निविदा प्रक्रियेसंदर्भात काही वाद निर्माण झाल्यास ग्रामपंचायतीचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१४)अंदाजपत्रक दरा पेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास शासन निर्णयक्रं. बीडीजी २०१६ /प्रक्रं.२ /इमा.२ / मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.१२.२.२०१६ नुसार १० टक्के पर्यंत कमी दर भरल्यास १ टक्के तसेच १० टक्के पेक्षा जेवढया दराने कमी आहे त्याच्या प्रत्येक टक्क्यास १ टक्का उदा.१४ टक्के कमीदर असल्यास १० टक्के पर्यत १ टक्का व वरील ४ टक्क्यास ४ टक्के असे एकुण ५ टक्के रक्कमेचा विशेष सुरक्षा ठेव रक्कमेचा सरकारी बँक किंवा शेडयूल बॅकेचा सरपंच ग्रामपंचायत **डोंगरगांव दा, ता बदनापुर जि जालना** या नावाचा धनादेश लिफाफा क्र.२ मध्ये सादर करणेचा आहे. धनाकर्षावर MICR व IFSCकोड नंबर असणे आवश्यक आहे. तसेच धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांका नंतर किमान ३ महिने पर्यत असणे आवश्यक आहे. कमी दराची निविदा दाखल केलेल्या ज्या ठेकेदारांचा धनाकर्ष लिफाफा क्र.२ मध्ये प्राप्त होणार नाही अशा ठेकेदारांची भरलेली निविदा नामंजूर करणेत येईल.

मक्तेदाराने निविदा दोन लिफाफयात सादर करणेची आहे. सदर लिफाफयात पुढील कागदपत्रे सादरकरणेची आहेत.

**लिफाफा क्र.१- तांत्रिक लिफाफा**

१. निविदा फी व बयाना रक्कम फक्त DD/चलन व्दारेच स्विकारली जाईल. निविदा फी व बयाना रक्कम निविदा भरताना DD/चलन **स्कॅन करून** . संबधीत तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करणेत यावे. व निविदा उघडण्याच्या 1दिवस अगोदर ग्रामपंचायत कार्यालय **डोंगरगांव दा** ता. बदनापुर येथे जमा करावा.
२. जि.प.कडीलनोंदणीकेलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत
३. पॅनकार्ड,GST रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट सत्यप्रत
४. विहीत नमुन्यातील मक्तेदाराचे त्याचे लेटर हेडवर तयारकेलेले बंधपत्र
५. ITR

**लिफाफा क्र.२ - आर्थिक लिफाफ** १ बीओक्यू

सोबत- NIT सोबत – सदरकामाचे सविस्तर अदाजपत्रक जोडलेले आहे.

**ग्रामसेवक सरपंच**

**ग्रामपंचायत डोंगरगांव दा ता बदनापुर**

Signature Not Verified

Digitally signed by Lilabai Vishnu Padol
Date: 2026.05.15 12:40:33 IST
Location: Maharashtra-MH